क्रमांक : ४

# महाराष्ट्र विधानसभा
## पत्रक भाग दोन

**सोमवार, दिनांक १९ फेब्रुवारी, २०२४ / माघ ३०, शके, १९४५**

४. सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेच्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरिता पहिल्या व दुसऱ्या आठवड्यातील विभागाकडे निर्देशित केलेले प्रश्न वस्तुस्थिती ग्राह्य धरुन दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२३ या दोन दिवसांकरीता तारांकित स्वीकृत करण्यात आले होते. तथापि, महाराष्ट्र विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बैठकीत सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाचा कालावधी बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजीपर्यंत निश्चित करण्यात आल्यामुळे उक्त दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२३ रोजीकरिता तारांकित स्वीकृत करण्यात आलेले प्रश्न फेरविचारांती अतारांकित स्वीकृत करण्यात आले आहेत.

तसेच दिनांक २१ ते २९ डिसेंबर, २०२३ या कालावधीकरीता कार्यवाहीत घेण्यात आलेल्या सर्व प्रश्न सूचना, प्राप्त झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचनेपैकी बॅलेटमध्ये आलेल्या व दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात येऊन चर्चा न झालेल्या प्रलंबित अर्धा-तास चर्चेच्या सूचना व्यपगत करण्यात आल्या आहेत.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १९ फेब्रुवारी, २०२४

जितेंद्र भोळे
सचिव (१) (कार्यभार)
महाराष्ट्र विधानसभा

प्रति :

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.

(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.

(४) संगणक कक्ष (वेबसाईट) व MKCL कक्ष.

Scanned with OKEN Scanner